Except Nagar only Pune

ॲग्रोवन स्मार्ट शेतकरी ॲवॉर्ड वितरण २९ डिसेंबरला

पुण्यात विशेष सोहळ्याचे आयोजन

पुणे (प्रतिनिधी) : 'ॲग्रोवन स्मार्ट शेतकरी ॲवॉर्ड'चे वितरण २९ डिसेंबर रोजी पुण्यातील टिळक स्मारक मंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमात केले जाणार आहे. राज्यभरातील अकरा पुरस्कार विजेत्या शेतकऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरवण्यात येईल. पुरस्काराचे हे दुसरे वर्ष आहे.

राज्यातील शेतकरी गेल्या काही वर्षांपासून नैसर्गिक आपत्तींच्या अस्मानी आणि शेतकरीविरोधी धोरणांच्या सुलतानी संकटांचा सामना करत आहेत. याही परिस्थितीत अनेक शेतकरी कल्पकता, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर आव्हानांवर मात करण्याची धडपड करत आहेत. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यश मिळवलेल्या शेतकऱ्यांच्या कर्तृत्वाची दखल घेतली जावी आणि इतर शेतकऱ्यांना त्यांच्यापासून प्रेरणा मिळावी, या हेतूने हे पुरस्कार दिले जातात. या उपक्रमासाठी सोनाई कॅटल फिड्स, यूपीएल, जैन इरिगेशन सिस्टिम्स लि, स्मार्टकेम फर्टीलायझर्स लि. बँक ऑफ महाराष्ट्र, ओरियंटल इन्शुरन्स, चौधरी यात्रा कंपनी प्रा. लि यांचे प्रायोजकत्व लाभले आहे.

पुरस्कार वितरण सोहळा
- **तारीख : २९ डिसेंबर २०१७**
- **स्थळ : टिळक स्मारक मंदिर, टिळक रोड, पुणे**
- **वेळ : सायंकाळी ४ ते ७ वाजता**

राज्यस्तरीय सहा व विभागीय पाच अशा एकूण अकरा गटांमध्ये हे पुरस्कार दिले जाणार आहेत. या पुरस्कारांसाठी राज्यभरातील शेतकऱ्यांमधून मोठा प्रतिसाद मिळाला. त्रयस्थ निवड समितीने त्यातून अकरा विजेत्यांची निवड केली आहे. आजपासून टप्प्याटप्प्याने पुरस्कार विजेत्यांच्या नावांची घोषणा 'ॲग्रोवन'मधून केली जाणार आहे. या विजेत्यांच्या यशोगाथा आज (ता. २०) पासून प्रसिद्ध होत आहे. 'ॲग्रोवन महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी' या पुरस्काराची घोषणा मात्र २९ डिसेंबरच्या मुख्य समारंभात केली जाईल. महाराष्ट्रातील कृषी व ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडविणारा खास कार्यक्रम या प्रसंगी सादर केला जाणार आहे.

राज्य पातळीवरील 'ॲग्रोवन महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी' पुरस्कार मिळवणाऱ्या शेतकऱ्याला एक लाख रुपये, सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. 'ॲग्रोवन प्रेरणा' आणि 'ॲग्रोवन स्मार्ट महिला शेतकरी' पुरस्काराची रक्कम प्रत्येकी २५ हजार रुपये आहे, तर विभागीय पातळीवरील 'स्मार्ट शेतकरी' पुरस्कार तसेच सेंद्रिय शेती, कृषिपूरक व्यवसाय, कृषी उद्योजक पुरस्कार प्रत्येकी १० हजार रुपयांचा आहे. या विजेत्यांनाही सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह दिले जाणार आहे.

सामूहिक शेततळ्यासाठी दहा कोटींचे अनुदानवाटप

सोलापूर, उस्मानाबाद जिल्ह्यांनी घेतली आघाडी

पुणे (प्रतिनिधी) : राज्यातील काही कोरडवाहू जिल्ह्यांत सामूहिक शेततळ्याची संकल्पना रुजविण्यात कृषी खात्याला यश मिळते आहे. राज्यात १५ डिसेंबरपर्यंत तळे बांधलेल्या शेतकऱ्यांना ९ कोटी ५७ लाख रुपये वाटण्यात आले आहेत. त्यामुळे राष्ट्रीय फलोत्पादन अभियानामधून (एनएचएम) उस्मानाबाद आणि सोलापूर भागांत सर्वांत जास्त सामूहिक शेततळी आकाराला आली आहेत.

'एनएचएम'मधून सामूहिक शेततळ्यासाठी राज्यात ३४ जिल्ह्यांमध्ये १५ कोटी रुपये अनुदान वाटण्याचे प्रस्ताव कृषी विभागाने सादर केले होते. मात्र, योजनेला प्रतिसाद मिळत असल्याचे पाहून काही जिल्ह्यांसाठी अनुदान वाढवून देण्यात आले. त्यामुळे सुधारित आराखड्यानुसार तळ्यांसाठी यंदा २० कोटी ५७ लाख रुपये वाटण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यात १५ डिसेंबरपर्यंत तळे बांधलेल्या शेतकऱ्यांना ९ कोटी ५७ लाख रुपये वाटण्यात आले आहेत. यात सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दोन कोटी २२ लाख रुपये, तर उस्मानाबादमध्ये दोन कोटी ६० लाख रुपये देण्यात आलेले आहेत.

कोरडवाहू जिल्ह्यांमध्ये सामूहिक शेततळ्याची संकल्पना रुजवण्यात यश मिळते आहे. त्यामुळेच औरंगाबादला आतापर्यंत ४१ लाख, जालना ९० लाख, बीड ६४ लाख, लातूर ४७ लाख तर परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ५२ लाख रुपये अनुदान मिळाले आहे. सामूहिक शेततळे उभारण्यासाठी शेतकऱ्याला प्रथम तालुका कृषी अधिकाऱ्याकडे अर्ज करावा लागतो. सातबारा व आठ ''अ''च्या उताऱ्यासह शेतकऱ्यांना पाणी व जमीनवापराबाबत आपआपसातील सामंजस्य करार १०० रुपयांच्या स्टँपपेपरवर लिहून द्यावा लागतो, अशी माहिती सूत्रांनी दिली.

अजून साडेदहा कोटी रुपये वाटले जाण्याची शक्यता

सामूहिक शेततळ्यासाठी एनएचएममधून राज्यात अजून साडेदहा कोटी रुपये अनुदानपोटी वाटले जाण्याची शक्यता आहे. जिल्हास्तरीय समितीने शेतकऱ्याचा प्रस्ताव मंजूर केल्यानंतर एक महिन्याच्या आत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्याकडे अंतिम प्रस्ताव सादर होतात. 'जिल्हा अधीक्षकाने मंजुरी दिल्यानंतर तीन महिन्यांत शेतकऱ्याला शेततळे उभारावे लागते. तळ्याचे मातीकाम पूर्ण झाल्यानंतर ८० टक्के अनुदान मिळते व उर्वरित अनुदान तळ्यात पाणी साठल्यानंतर दिले जाते, असे कृषी विभागाचे म्हणणे आहे.

कृषी विभागाकडूनही 'त्या' कंपनीच्या बीटी बियाणे नमुन्याची तपासणी

अकोला (प्रतिनिधी) : नांदुरा तालुक्यात असलेल्या महाराष्ट्र हायब्रीड सीड कंपनी (महिको)च्या गोदामांवर शुक्रवारी (ता. ८) पोलिसांनी सील करण्याची कारवाई केली. या कारवाईत सुरवातीला कृषी विभागाला बाजूला ठेवण्यात आले होते. पोलिसांची तपासणी झाल्यानंतर आता कृषी विभागानेही बीटी बियाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठविले आहेत.

जालना जिल्ह्यात झालेल्या तक्रारीनंतर पोलिस विभागाने आठ डिसेंबरला बुलडाणा जिल्ह्यात नांदुरा तालुक्यातील धानोरा या ठिकाणी असलेल्या कंपनीच्या गोदामांना सील केले होते. पोलिसांनी तपासणी केल्यानंतर कृषी विभागाची यंत्रणा तातडीने तेथे पोचली होती. लगेच दुसऱ्या दिवशी कृषी विभागानेही तेव्हा बीटी कपाशीचे नमुने तपासणीसाठी घेऊन गोदाम सील केले होते.

ही संपूर्ण कारवाई गोपनीय पद्धतीने होत आहे. अद्याप पोलिस तसेच कृषी विभागाकडून कुठलीही माहिती 'लीक' झालेली नाही. विशेष म्हणजे या ठिकाणी पोलिस कारवाईच्या दुसऱ्या दिवशी शनिवारी (ता. ९) दिवसभर विभागीय सहसंचालक सुभाष नागरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रमोद लहाळे व इतर वरिष्ठ, तालुकास्तरीय अधिकाऱ्यांची चमू तळ ठोकून होती. त्यानंतर पुन्हा गुरुवार (ता. १४)पासून नमुने घेण्याचे काम सुरू असल्याचे एका अधिकाऱ्याने स्पष्ट केले. लवकरच ही कारवाई पूर्ण होईल, असेही सांगण्यात आले.

वरिष्ठांच्या निर्देशाप्रमाणे कंपनीमधील बियाण्यांचे नमुने घेतले जात असून, फौजदारी कारवाईच्या अनुषंगाने कागदपत्रांची जुळवाजुळव केली जात असल्याचे जिल्हा परिषद वर्तुळातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

सकाळ ॲग्रोवन
आयोजित
MAHAVIR STEEL INDUSTRIES LTD ...दूसरे तिसरे कोई नको
प्रायोजित
सकाळ ॲग्रोवन संवाद
'ॲग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद
कार्यक्रम वेळापत्रक
गुरूवार, २१ डिसेंबर २०१७
विषय - निर्यातक्षम द्राक्ष उत्पादन
वक्ते- श्री. मंगेश भास्कर
(द्राक्षतज्ज्ञ)
स्थळ - राजा शिवछत्रपती सभागृह, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मु.पो. गुंजाळवाडी, ता. जुन्नर जि. पुणे, वेळ - सायं. ५.३० वाजता
या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.